जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ५१२ दिनांक - ०८/०७/२०२३**

# भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन,पुणे शहर

मोक्यामध्ये सहा महीन्यापासुन फरार असलेला आरोपी भारती विद्यापीठ पोलीसांकडुन जेरबंद

दिनांक ०७/०७/२०२३ रोजी कॉम्बींग ऑपरेशन दरम्यान भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनकडील तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन हद्दीत रेकॅार्डवरील आरोपी चेक करीत असताना पोलीस अंमलदार अभिजीत जाधव, विक्रम सावंत, राहुल तांबे यांना त्यांचे बातमीदारामार्फेतीने भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन,पुणे गुन्हा रजि नंबर ११९/२०२३ भा.द.वि कलम ३०७,३२३,१४३,१४४,१४७,१४८,१४९ आर्म ॲक्ट ४(२५),महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(३)सह १३५ महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा कलम ३(१)(ii),३(२),३(४) या गुन्हयामध्ये मागील सहा महीन्यापासुन पाहीजे असलेला आरोपी ओंकार दादाभाऊ बारावकर,ऊर्फ ओमी,वय १९ वर्षे, रा.त्रिकोणी बंगल्याजवळ,संतोषनगर,जैन मंदीर पायथा,कात्रज,पुणे हा संतोषनगर,जैन मंदीराजवळील नाकोडा मंदाराजवळ थांबला आहे.

त्याबातमीनुसार भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनचे तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी जैन मंदीराजवळील नाकोडा मंदीराजवळ जावुन आरोपीचा शोध घेतला असता तो मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन पुढील कारवाईकामी गुन्हयाचे तपासी अधिकारी मा. नारायण शिरगावकर, सहाय्यक पोलीस आयुक्त सो, स्वारगेट विभाग, पुणे यांचे ताब्यात देण्यात आले असुन त्यांनी सदर आरोपीतास नमुद गुन्हयामध्ये अटक केली आहे.

सदरची कारवाई मा.अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशीक विभाग, पुणे श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप आयुक्त परिमंडळ २, श्रीमती स्मार्तना पाटील, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग, पुणे श्री.नारायण शिरगावकर यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशनकडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विजय कुंभार, तसेच पोलीस निरीक्षक (गुन्हे) विजय पुराणिक, सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल रसाळ, पोलीस उप निरीक्षक सागर भोसले, पोलीस अंमलदार अभिजीत जाधव, विक्रम सावंत, राहुल तांबे, सचिन सरपाले, निलेश ढमढेरे, चेतन गोरे, मंगेश पवार, हर्षल शिंदे, अवधुत जमदाडे, निलेश खैरमोडे, धनाजी धोत्रे, सचिन गाडे, अभिनय चौधरी, अशिष गायकवाड, यांच्या पथकाने केली आहे.